ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 01 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## नेपाळने बळकावली भारताची जमीन, बालेन शाह यांनी दिली कबुली





पान 2 वरुन...

भीमाशंकर मंदिर १५ दिवस आणखी बंद

## हत्येला प्रवृत्त करणाऱ्या वडिलांसह 3 आरोपी जेरबंद

# गाझियाबाद हत्या प्रकरणातील आरोपीचा इन्काउंटर



महाईन्यूज । नवी दिल्ली

**उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये २८ मे रोजी ईदच्या दिवशीच सूर्य प्रताप चौहान या तरुणाची हत्या करण्यात आली.या घटनेमुळे स्थानिक नागरिक आणि हिंदू संघटनांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला होता आणि आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी करत त्यांनी निदर्शने केली होती.**

दरम्यान, या प्रकरणातील मुख्य आरोपी असद हा पोलीस चकमकीत ठार झाला आहे, तर त्याच्या वडिलांसह इतर तीन आरोपींना गुन्ह्यातील सहभागाबद्दल अटक करण्यात आली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

या हत्येप्रकरणी पोलीस उपायुक्त धवल जैस्वाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात पाच जणांवर आरोप करण्यात आले आहेत. चकमकीपूर्वी असदचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सतत छापे टाकत होती. जैस्वाल म्हणाले, "या प्रकरणात पाच जणांची आरोपी म्हणून नोंद करण्यात आली. घटनेनंतर लगेचच पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली, तर मुख्य आरोपी असद फरार होता. त्याला पकडण्यासाठी अनेक पोलीस पथके तयार करण्यात आली होती आणि त्याच्यावर ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते."

गुप्तचरांकडून मिळालेल्या माहितीनुसार, असद त्याच्या साथीदारांकडून पैसे गोळा करून परिसरातून पळून जाण्याच्या तयारीत होता. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नाकाबंदी करून तपासणी मोहीम सुरू केली.

"नाकाबंदीदरम्यान पोलिसांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, पण त्याने पोलीस पथकावर गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात असद गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले", असे जैस्वाल यांनी पुढे सांगितले. चकमकीच्या ठिकाणाहून एक मोटारसायकल आणि एक शस्त्रास्त्र हस्तगत करण्यात आले आहे, असे पोलिसांनी सांगितले.

### पोलिसांच्या गोळीबारात असदचा मृत्यू...

असद हा २८ मे रोजी झालेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेपासून फरार होता आणि त्याच्यावर ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. शनिवारी उशिरा रात्री खोडा आणि इंदिरापुरम पोलिसांच्या संयुक्त पथकासोबत झालेल्या गोळीबारात तो मारला गेला. पोलिसांच्या प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला आणि रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या गोळीबारात एक पोलीस अधिकारी देखील जखमी झाला असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### तरुणाची हत्या का झाली होती?

चौकशीदरम्यान फरहानने तपास अधिकाऱ्यांना सांगितले की, २८ मे रोजी दुपारी असद आणि सूर्य यांच्यात मोटारसायकल चालवण्यावरून झालेल्या वादातून हा सगळा प्रकार घडला. या वादानंतर त्याने आणि नवाबने असदसोबत मिळून सूर्य प्रतापची हत्या करण्याचा कट आखला. तपास अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, फरहानने चौकशीत कबूल केले की आरोपींनी दुपारी ३.३० च्या सुमारास नवनीत विहारमध्ये सूर्य प्रतापला गाठले. त्याने असदच्या हातात चाकू दिला, तर नवाबने त्याला चिथावणी देत, "आज याची कहाणी संपवून टाक", असे म्हटले. चाकूने सपासप वार झाल्यामुळे सूर्य प्रताप रस्त्यावर कोसळला. तो मरण पावला आहे असे समजून आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, पोलिसांनी या हत्येप्रकरणी नवाब, फरहान आणि आतिफ अशा आणखी तीन आरोपींना अटक केली आहे. नवाब हा मृत आरोपी असदचा पिता आहे.

# भीमाशंकर मंदिर १५ दिवस आणखी बंद

## सभामंडपाचे आच्छादन आणि पायरी मार्गाचे काम सुरू; १५ जूननंतर निर्णय

**महाईन्यूज । पुणे**

**श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरासमोरील सभामंडप व पायरी मार्गाच्या कामामुळे बंद ठेवण्यात आलेल्या मंदिराच्या बंद कालावधीला आणखी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे १ जूनपासून मंदिर सुरू होण्याची अपेक्षा असलेल्या भाविकांना आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार असून, १५ जूननंतर मंदिर दर्शनासाठी खुले केले जाणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी दिली.**



भीमाशंकर मंदिरासमोरील सभामंडप आणि पहिल्या पायरी मार्गाचे काम मागील पाच महिन्यांपासून सुरू असून त्यासाठी मंदिर बंद ठेवण्यात आले आहे. सध्या काम अंतिम टप्प्यात आले असले तरी सभामंडपाचे उर्वरित काम आणि पायरी मार्गाच्या शेवटच्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण होण्यासाठी आणखी काही दिवस लागणार आहेत.

प्रशासनाच्या माहितीनुसार, सभामंडपाचे आच्छादन आणि पायरी मार्गाच्या शेवटच्या पायऱ्यांचे काम पूर्ण करण्यासाठी सुमारे आठ ते दहा दिवसांचा कालावधी लागणार आहे. त्यानंतर मंदिर परिसरातील साफसफाई, बांधकाम साहित्य व राडारोडा हटवून परिसर पूर्ववत करण्यासाठी अतिरिक्त वेळ आवश्यक असल्याने मंदिर सुरू करण्यास विलंब होत आहे. मुदतवाढीचा निर्णय घेण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्त्व विभाग, देवस्थान ट्रस्ट आणि स्थानिक पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली. कामाची सद्यस्थिती आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा आढावा घेतल्यानंतर सर्वानुमते मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी १५ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली.

दरम्यान, मंदिर बंद असल्यामुळे भाविकांसह स्थानिक दुकानदार, हॉटेल व्यावसायिक आणि इतर संबंधित घटकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मंदिरासमोरील सभामंडपाचे बांधकाम आणि पायरी मार्गाचे सुशोभीकरण अंतिम टप्प्यात पोहोचले असून, काम पूर्ण झाल्यानंतर भाविकांना अधिक सुरक्षित आणि सुविधायुक्त वातावरणात दर्शन घेता येणार आहे.

### भाविकांसाठी महत्त्वाची सूचना

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरासमोरील सभामंडप व पायरी मार्गाच्या कामामुळे मंदिराच्या बंद कालावधीला आणखी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. उर्वरित बांधकाम, परिसराची स्वच्छता व सुरक्षेच्या उपाययोजना पूर्ण झाल्यानंतर १५ जूननंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात येणार आहे. प्रशासनाने भाविक व स्थानिक व्यावसायिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# इंडिगोच्या गुवाहाटी विमानात मिळाली 'बॉम्ब' लिहिलेली चिठ्ठी

**महाईन्यूज । पुणे**

**हडपसर येथील एका खासगी रुग्णालयात बॉम्ब ठेवण्यात आल्याची घटना ताजी असतानाच आता पुण्याहून गुवाहाटीला जाणाऱ्या विमानातील प्रसाधनगृहात 'बॉम्ब' असे लिहिलेली चिठ्ठी सापडल्याने सर्वांचेच धाबे दणाणले. चिठ्ठी सापडल्यानंतर संपूर्ण विमानाची तपासणी करण्यात आली. मात्र, कोणतीही आक्षेपार्ह वस्तू मिळून आली नसल्याने विमानतळ अधिकाऱ्यांनीही सुटकेचा नि:श्वास सोडला. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.**

इंडिगो विमान कंपनीचे सहायक सुरक्षा प्रमुख विशालकुमार श्रीवास्तव (वय ३०, रा. लोहगाव) यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडिगो कंपनीचे पुणे ते गुवाहाटी हे विमान २९ मे रोजी सकाळी ७ वाजता आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेणार होते.

विमानात प्रवासी बसलेले असताना त्या विमानात काम करणाऱ्या एअरहोस्टेसला विमानाच्या लेव्हीटरीमध्ये एका पांढऱ्या रंगाच्या पेपरच्या तुकड्यावर 'बॉम्ब' असे लिहिलेली चिठ्ठी सापडली. तिने ही चिठ्ठी लीड केबीन क्रू यांच्या ताब्यात दिली. पहाटे ६ वाजून ४४ मिनिटांनी याची माहिती सुरक्षा विभागाला दिल्यानंतर प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. तसेच कंपनीच्या अभियंत्यांनी विमान आयसोलेशनला नेले.




विमानाची बीडीडीएस पथक, एअर लाईन इंजिनिअरिंग पथक, एअर लाईन्स सिक्युरिटी पथकाकडून तपासणी करण्यात आली. त्यात विमानात कोठेही आक्षेपार्ह वस्तू आढळून आली नाही. विमानामध्ये तसेच लेव्हीटरीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने ती चिठ्ठी कोणी लिहिली हे समजू शकलेले नाही. कागदाच्या तुकड्यावर बॉम्ब असा धमकीचा संदेश लिहून प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आणून भीतीचे वातावरण निर्माण केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस उपनिरीक्षक कांतीलाल गुंड तपास करीत आहेत.

### चिठ्ठीने उडाली खळबळ

पुणे ते गुवाहाटी जाणाऱ्या इंडिगो विमानाच्या प्रसाधनगृहात 'बॉम्ब' असे लिहिलेली चिठ्ठी सापडल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली. प्रवाशांना तातडीने खाली उतरवून विमानाची सखोल तपासणी करण्यात आली. मात्र कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# फुगेवाडी दारूकांड : मृतांच्या कुटुंबांना ₹५ लाख

## मृतांच्या वारसांना आर्थिक मदत व नोकरीची संधी; मंत्री महाजनांचा कठोर कारवाईचा इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**फुगेवाडी येथील विषारी दारू पिऊन मृत झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार आहे, असे राज्याचे आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी (दि. 30) सांगितले. या प्रकरणात अतिउच्च अधिकारी दोषी असल्यास त्यांनाही सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**





मंत्री गिरीश महाजन यांनी आज फुगेवाडी भागास भेट दिली. मृतांच्या कुटुंबीय, नातेवाईकांनाची भेट घेऊन त्यांचे सात्वंन केले. त्यांना धीर दिला. या वेळी आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, महापौर रवी लांडगे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी खासदार अमर साबळे आदी उपस्थित होते.

माध्यमाशी बोलताना मंत्री महाजन म्हणाले, मिथेनॉलचे मिश्रण करून विषारी दारूची विक्री केली जात होती. ती दारू पिल्याने 19 जणांचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार आहे.

रोजीरोटीसाठी त्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत कंत्राटी पद्धतीने सामावून घेतले जाणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने 13 जणांना निलंबित केले आहे. दारू विक्रीकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना कडक शब्दात सूचना दिल्या आहेत. यापुढे एक थेंबही दारूची विक्री होणार नाही. यातील एकही दोषी सुटणार नाही, असे महाजन यांनी सांगितले.

### फुगेवाडी दारूकांडग्रस्तांना दिलासा

फुगेवाडी येथील विषारी दारूकांडात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ₹५ लाखांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा मंत्री गिरीश महाजन यांनी केली. तसेच संबंधित कुटुंबातील एका सदस्याला कंत्राटी स्वरूपात रोजगार देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

> "फुगेवाडी येथील विषारी दारूकांडात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ₹५ लाखांची मदत दिली जाणार आहे. तसेच कुटुंबातील एका सदस्याला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या प्रकरणातील दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. संबंधित यंत्रणांच्या भूमिकेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल."
>
> **- गिरीश महाजन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री**

# मुळा नदीची दयनीय अवस्था; कोट्यवधी खर्चानंतरही प्रदूषण कायम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील नद्यांच्या संवर्धनासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असले तरी मुळा नदीची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे वास्तव समोर आले आहे. नदीकाठावर कचऱ्याचे ढीग, राडारोडा, फेसाळलेले पाणी, जलपर्णीचा साठा आणि नदीपात्रातील मानवी हस्तक्षेपामुळे नदी प्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहे. त्यामुळे नदी संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



> "बाधित भागांची पाहणी करून आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. महापालिका, पर्यावरण विभाग आणि इतर यंत्रणांच्या समन्वयातून नदी स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे."
>
> **- शांताराम माने, आरोग्य विभागीय अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय**

प्रत्यक्ष पाहणीत अनेक ठिकाणी नदीकाठाचे नैसर्गिक स्वरूप बदलल्याचे दिसून आले. नदीतील जलपर्णी काढण्यात आली असली तरी ती नदीकाठावरच टाकून दिल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच डास आणि कीटकांचे प्रमाण वाढल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे स्वच्छता मोहिमेच्या कामांमध्ये केवळ दिखाऊपणा होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

नदीच्या काही भागांत पाण्यावर पांढऱ्या फेसाचे थर साचल्याचे आढळून आले. स्थानिकांच्या मते, दूषित सांडपाणी आणि रासायनिक घटक मिसळल्याने ही परिस्थिती निर्माण होत आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, फेसाळलेले पाणी हे नदीतील रासायनिक प्रदूषणाचे गंभीर संकेत असून त्याचा परिणाम जलचरांवर होत आहे.

याशिवाय काही ठिकाणी प्लास्टिक, थर्माकोल, काचा आणि इतर घनकचरा नदीपात्रात टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. पावसाळ्यात हा कचरा वाहून जाऊन नदीचा प्रवाह अडवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काही भागांत मोटरच्या सहाय्याने थेट पाणीउपसा सुरू असल्याने नदीवरील ताण आणखी वाढत असल्याचेही समोर आले आहे.

नदीपात्रातील कचरा हटविणे, जलपर्णीची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, दूषित नाल्यांची तपासणी, पाणीउपशावर नियंत्रण आणि प्रदूषण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### फेसाळलेले पाणी नेमके कुठून ?

काही भागात नदीचे पाणी फेसाळलेल्या अवस्थेत दिसून आले. पाण्यावर पांढऱ्या फेसाचे थर जमा झाल्याने नदीतील प्रदूषणाची तीव्रता स्पष्टपणे जाणवत होती. स्थानिकांच्या मते, काही नाल्यांमधून येणारे दूषित सांडपाणी आणि रासायनिक घटकांमुळे ही परिस्थिती निर्माण होत आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, नदीतील फेस ही केवळ सौंदर्यहानी नसून पाण्यातील रासायनिक बदलांची गंभीर चिन्हे असू शकतात. याचा थेट परिणाम जलजीवनावर होत असून मासे आणि इतर जलचरांसाठी ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे.



## भूमिका

# अमेरिकन स्वप्नांवर अनिश्चिततेची सावली




**अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध आज जगातील सर्वात महत्त्वाच्या द्विपक्षीय भागीदारीपैकी एक मानले जातात. संरक्षण, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातील सहकार्यामुळे या संबंधांना सातत्याने बळकटी मिळत आहे.**

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्या भारत दौऱ्याने या मैत्रीला आणखी अधोरेखित केले असले, तरी दुसऱ्या बाजूला अमेरिकेच्या स्थलांतर धोरणातील नव्या बदलांमुळे लाखो भारतीयांच्या भविष्यावर अनिश्चिततेची छाया पडली आहे.

ट्रम्प प्रशासनाने ग्रीन कार्ड प्रक्रियेत प्रस्तावित केलेल्या बदलांनुसार, अमेरिकेत तात्पुरत्या व्हिसावर राहणाऱ्या परदेशी नागरिकांना कायमस्वरूपी निवासी दर्जासाठी आपल्या मायदेशात परत जाऊन अर्ज करावा लागणार आहे. गेल्या अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेल्या 'अ‍ॅडजस्टमेंट ऑफ स्टेटस' या प्रक्रियेला यामुळे मोठा धक्का बसू शकतो. याचा सर्वाधिक परिणाम भारतीयांवर होण्याची शक्यता आहे, कारण अमेरिकेत उच्च कौशल्याधारित रोजगार व्हिसावर काम करणाऱ्यांमध्ये भारतीयांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवा, संशोधन, वित्तीय क्षेत्र आणि शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत भारतीयांनी अमेरिकेच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. अनेक भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जातात आणि त्यानंतर तेथेच करिअर घडवण्याचा प्रयत्न करतात. मात्र, नव्या धोरणामुळे त्यांच्या स्थायिक होण्याच्या प्रक्रियेत अधिक अडथळे निर्माण होऊ शकतात. आधीच रोजगाराधारित ग्रीन कार्डसाठी भारतीय अर्जदारांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागत आहे. आता प्रक्रियेतील अतिरिक्त अटींमुळे ही प्रतीक्षा आणखी कठीण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अमेरिकेच्या दृष्टीने पाहता, हा निर्णय देशांतर्गत सुरक्षेला प्राधान्य देणारा आहे. अर्ज फेटाळल्यानंतर संबंधित व्यक्ती अमेरिकेत बेकायदेशीररित्या राहण्याची शक्यता कमी करण्याचा यामागील उद्देश असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. परंतु सुरक्षा आणि आर्थिक विकास यांच्यात समतोल राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. उच्च कौशल्य असलेल्या परदेशी व्यावसायिकांमुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था अधिक स्पर्धात्मक बनली आहे. त्यामुळे अशा व्यक्तींना अडचणीत आणणारी धोरणे दीर्घकालीन दृष्टीने अमेरिकेलाही महागात पडू शकतात. ट्रम्प यांची स्थलांतराबाबतची कठोर भूमिका नवीन नाही. अवैध स्थलांतर रोखणे हा त्यांच्या राजकारणाचा प्रमुख आधार राहिला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर स्थलांतराचा मुद्दा पुन्हा एकदा राजकीय केंद्रस्थानी येत आहे. त्यामुळे कठोर धोरणांद्वारे देशांतर्गत मतदारांना संदेश देण्याचा प्रयत्न होत असल्याचे स्पष्ट दिसते.

भारत आणि अमेरिका यांचे संबंध केवळ सरकार ते सरकार इतके मर्यादित नाहीत. अमेरिकेतील भारतीय समाज हा दोन्ही देशांमधील सर्वात मजबूत दुवा आहे. विज्ञान, उद्योग, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रातील भारतीयांचे योगदान दोन्ही देशांसाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्थलांतर धोरणातील बदलांचा विचार करताना मानवी, आर्थिक आणि राजनैतिक परिणामांचा व्यापक विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा लाखो भारतीयांच्या अमेरिकन स्वप्नांवर अनिश्चिततेची सावली आणखी गडद होण्याचा धोका आहे.

## प्रासंगिक »

### घुबड आणि टोळ

**एका मोठ्या झाडाच्या ढोलीत एक म्हातारे घुबड राहत होते. दिवसभर ते शांतपणे झोप घेत असे.**

एके दिवशी ते झोपलेले असताना झाडाखाली एक टोळ मोठ्याने गाणे म्हणू लागला. त्याच्या कर्कश आवाजामुळे घुबडाची झोपमोड झाली. घुबडाने नम्रपणे टोळाला विनंती केली, "बाबा रे, कृपया दुसरीकडे जाऊन गाणे म्हण. तुझ्या आवाजामुळे मला त्रास होतो आहे." मात्र टोळाने त्याचे ऐकले नाही. उलट तो घुबडाची निंदा करू लागला आणि त्याला वाईट शब्द बोलू लागला. घुबडाने त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, पण टोळ आपल्या हट्टी स्वभावामुळे ऐकायला तयार नव्हता. शेवटी घुबडाने एक युक्ती केली. त्याने टोळाच्या गाण्याची खोटी स्तुती करत म्हटले, "तुझा आवाज खूप गोड आहे. तुझ्यासारखा गायक दुसरा कोणी नाही. माझ्याकडे अमृताची कुपी आहे, त्यातील थोडे अमृत घे. त्यामुळे तुझा घसा ताजा होईल." गाणे म्हणत असल्यामुळे टोळाला खरोखरच तहान लागली होती. घुबडाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून तो अमृत घेण्यासाठी त्याच्याजवळ गेला. संधी साधून घुबडाने त्याला पकडले आणि गिळून टाकले.

-तात्पर्य : दुसऱ्यांच्या आवडी-निवडींचा आदर करावा. अहंकार, हट्टीपणा आणि दुसऱ्यांचा विचार न करणे यामुळे शेवटी स्वतःचेच नुकसान होते.

**महागाई ही केवळ आर्थिक आकडेवारी नसून ती प्रत्येक कुटुंबाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेली गंभीर समस्या आहे. किराणा माल, इंधन, गॅस, औषधे, शिक्षण आणि घरभाड्याच्या वाढत्या खर्चामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित विस्कळीत झाले आहे**

# महागाईची धग आणि धोरणांची कसोटी



उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचा वेग अधिक वाढत असल्याने मध्यमवर्ग आणि गरीब कुटुंबांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. सध्या जागतिक पातळीवर सुरू असलेल्या संघर्षांचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही दिसून येत आहे. पश्चिम आशियातील तणाव, तेल पुरवठ्यातील अडथळे आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे इंधन दरांवर दबाव वाढला आहे. त्याचा परिणाम वाहतूक खर्चावर होऊन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एलपीजी सिलिंडरच्या वाढलेल्या किमतींमुळे घरगुती अर्थसंकल्पावर अतिरिक्त भार पडत आहे.

महागाईच्या प्रश्नाकडे केवळ जागतिक संकट म्हणून पाहता येणार नाही. देशांतर्गत पातळीवरही अनेक धोरणात्मक त्रुटी दिसून येतात. कृषी उत्पादनांची साठवणूक, वितरण व्यवस्था आणि बाजार व्यवस्थापनातील कमतरता यामुळे अनेकदा कृत्रिम टंचाई निर्माण होते. उत्पादन चांगले असूनही ग्राहकांना जास्त दर मोजावे लागतात. यामुळे शेतकरी आणि ग्राहक दोघांनाही फटका बसतो.

इंधनावरील कर, पुरवठा साखळीतील अकार्यक्षमता आणि वित्तीय शिस्तीचा अभाव यांचाही महागाईवर परिणाम होत आहे. विविध कल्याणकारी योजनांची आवश्यकता असली तरी त्यासाठी आवश्यक आर्थिक संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वाढती वित्तीय तूट आणि सरकारी खर्चाचा दबाव दीर्घकालीन महागाईला खतपाणी घालू शकतो. महागाईचा सर्वाधिक फटका असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतकरी आणि निश्चित उत्पन्न असलेल्या कुटुंबांना बसतो. वेतनवाढ आणि उत्पन्नवाढ महागाईच्या वेगाशी जुळत नसल्याने खरेदीशक्ती कमी होत आहे. परिणामी बचत घटत असून अनेक कुटुंबे कर्जाच्या ओझ्याखाली दबली जात आहेत.

महागाईवर नियंत्रणासाठी केवळ व्याजदर किंवा अल्पकालीन उपाय पुरेसे नाहीत. कृषी क्षेत्रातील सुधारणा, ऊर्जा स्रोतांचे वैविध्यीकरण, पुरवठा साखळी मजबूत करणे, बाजारातील पारदर्शकता आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजन आवश्यक आहे. महागाई ही केवळ अर्थशास्त्राची समस्या नाही; ती जनजीवनाशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने तात्पुरत्या उपायांपेक्षा शाश्वत धोरणांवर भर देण्याची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



नामे स्नानसंध्या केलें क्रियाकर्म ।
त्याचा भवश्रम निवारला ।।१।।

आणिके दुरावली करिता खटपट ।
वाउगे बोभाट वर्माविण ।।२।।

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लाडकी बहीण योजनेत ८० लाख महिला अपात्र

## ई-केवायसी छाननीनंतर लाभार्थ्यांची संख्या २.४६ कोटींवरून १.६६ कोटींवर

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत मोठा फेरबदल झाला असून ई-केवायसी प्रक्रिया आणि लाभार्थी पडताळणीनंतर तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. त्यामुळे योजनेतील लाभार्थ्यांची संख्या २ कोटी ४६ लाखांवरून थेट १ कोटी ६६ लाखांवर आली आहे.**



योजनेचा लाभ केवळ पात्र आणि गरजू महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी महिला व बालविकास विभागाकडून विशेष ई-केवायसी मोहीम राबविण्यात आली होती. अनेक महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया अपूर्ण ठेवली किंवा आवश्यक माहितीमध्ये त्रुटी राहिल्याने त्यांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत.

यासाठी शासनाने ३० एप्रिलपर्यंत ई-केवायसी दुरुस्तीसाठी मुदतवाढ दिली होती. मात्र, मुदत संपल्यानंतरही अनेक लाभार्थ्यांनी प्रक्रिया पूर्ण न केल्याचे छाननीत समोर आले. परिणामी अशा महिलांना योजनेतून वगळण्यात आले आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी अर्जदार महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच शासनाने निश्चित केलेल्या इतर पात्रता निकषांची पूर्तता करणेही बंधनकारक आहे. या अटी पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांनाही अपात्र घोषित करण्यात आले आहे.

दरम्यान, सध्या पात्र ठरलेल्या १ कोटी ६६ लाख महिलांना योजनेचा लाभ पूर्ववत मिळत राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यामुळे योजनेंतर्गत लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असली तरी पात्र लाभार्थ्यांपर्यंत निधी अधिक प्रभावीपणे पोहोचणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

### लाडकी बहीण योजनेत मोठी छाननी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील ई-केवायसी पडताळणी आणि पात्रता छाननीनंतर तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांची संख्या २ कोटी ४६ लाखांवरून १ कोटी ६६ लाखांवर आली आहे. ई-केवायसी अपूर्ण राहणे आणि पात्रता निकषांची पूर्तता न होणे ही अपात्रतेची प्रमुख कारणे असल्याचे सांगण्यात आले आहे.



# महायुतीत जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित...

**महाईन्यूज । मुंबई**

विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीतील जागावाटपाचा तिढा अखेर सुटला असून १७ जागांबाबत तिन्ही घटक पक्षांमध्ये एकमत झाले आहे. वरिष्ठ नेत्यांच्या चर्चेनंतर अंतिम फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून भाजप सर्वाधिक ११ जागांवर निवडणूक लढवणार आहे.

अंतिम वाटपानुसार, भाजपच्या वाट्याला ११ जागा आल्या असून शिवसेना (शिंदे गट) ४ जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) २ जागांवर उमेदवार उभे करणार आहे. त्यामुळे महायुतीत भाजपने पुन्हा एकदा 'मोठा भाऊ' म्हणून आपले वर्चस्व कायम राखले आहे.

भाजपकडे सोलापूर, जळगाव, भंडारा-गोंदिया, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर-जालना, अहिल्यानगर, सांगली-सातारा आणि नांदेड या जागा आल्या आहेत.

शिवसेनेच्या वाट्याला ठाणे, नाशिक, परभणी आणि यवतमाळ या चार महत्त्वाच्या जागा मिळाल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसला कोकण आणि पुणे या दोन जागांवर उमेदवार देण्याची संधी मिळाली आहे. जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला निश्चित झाल्यानंतर आता महायुतीकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी महायुतीची रणनीती स्पष्ट झाली असून विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# जरांगेंना दिलेली सर्व आश्वासने जाहीर; पाठीमागे कोणतीही गुप्त चर्चा नाही

**महाईन्यूज । कर्जत**

**मराठा समाजाला न्याय देण्याची राज्य सरकारची स्पष्ट भूमिका असून, मनोज जरांगे पाटील यांना दिलेली सर्व आश्वासने सार्वजनिकपणे मांडण्यात आली आहेत. पाठीमागे कोणतीही वेगळी आश्वासने देण्यात आलेली नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी येथे अभिवादन करण्यासाठी आले असता मुख्यमंत्री माध्यमांशी बोलत होते. मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्यानंतर त्यांना नेमकी कोणती आश्वासने देण्यात आली, याबाबत विचारणा करण्यात आली होती.

> "मराठा समाजाला न्याय देण्याचीच राज्य सरकारची भूमिका आहे. मनोज जरांगे पाटील यांना दिलेली सर्व आश्वासने जाहीरपणे सांगितली आहेत. पाठीमागे कोणतीही वेगळी आश्वासने दिलेली नाहीत. समाजाच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे."
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, जरांगे यांना देण्यात आलेली सर्व आश्वासने त्यांच्या समोरच मांडण्यात आली आहेत. ती स्वतः मनोज जरांगे, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांनी वाचून दाखवली आहेत. त्यामुळे याबाबत कोणतीही गुप्त किंवा वेगळी चर्चा झालेली नाही.

दरम्यान, जयंती महोत्सवाच्या खर्चाचे ऑडिट करण्याची मागणी करणारे आमदार रोहित पवार यांच्यावरही मुख्यमंत्र्यांनी टीका केली. अशा महत्त्वाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कार्यक्रमांना राजकीय रंग देणे योग्य नसल्याचे सांगत, राजकारण कुठे करावे आणि कुठे टाळावे याचे भान ठेवावे, असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करताना मुख्यमंत्री म्हणाले की, देशाची हिंदू अस्मिता जागृत ठेवणे, सनातन धर्माचे संरक्षण करणे आणि लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण करणे हे कार्य अहिल्यादेवींनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर लोकशासन आणि सुशासनाचा आदर्श त्यांनी घालून दिला.

# इराणला डोनाल्ड ट्रम्प यांचा थेट इशारा

## ‘आम्हाला हवे ते मिळाले नाही, तर विषय वेगळ्या पद्धतीने संपवू’

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील अणुकरारासंदर्भातील चर्चा सुरू असतानाच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कठोर इशारा दिला आहे. इराणसोबतच्या वाटाघाटी सकारात्मक दिशेने सुरू असल्या तरी कोणत्याही परिस्थितीत इराणला अण्वस्त्रे विकसित करू दिली जाणार नाहीत, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.**

एका विशेष मुलाखतीत बोलताना ट्रम्प म्हणाले, “आम्ही चांगल्या कराराच्या जवळ आहोत. मात्र घाई करून करार करण्यापेक्षा योग्य अटींवर करार होणे महत्त्वाचे आहे. आम्हाला जे अपेक्षित आहे ते मिळाले नाही, तर हा विषय वेगळ्या पद्धतीने संपवला जाईल.”

ट्रम्प यांनी इराणच्या लष्करासंदर्भातही भाष्य केले. अमेरिकेने इराणच्या नौदल आणि हवाई दलाची क्षमता मोठ्या प्रमाणात खिळखिळी केली असली तरी भूदलाला जाणीवपूर्वक लक्ष्य केले नसल्याचे त्यांनी सांगितले. एखाद्या देशाची संपूर्ण यंत्रणा उद्ध्वस्त केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होतात, असे मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी ट्रम्प यांनी अमेरिकेतील काही प्रसारमाध्यमांवरही टीका करत, इराणविरोधातील अमेरिकेच्या कारवायांचे योग्य चित्रण होत नसल्याचा आरोप केला.

दरम्यान, व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतरही अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चेत अंतिम तोडगा निघालेला नाही. अमेरिकेच्या हिताच्या अटी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही करारावर स्वाक्षरी केली जाणार नसल्याचे व्हाईट हाऊसने स्पष्ट केले आहे.

तसेच इराणकडूनही अद्याप अंतिम कराराला संमती देण्यात आलेली नाही.




### इराण-अमेरिका चर्चेकडे जगाचे लक्ष

अमेरिका आणि इराण यांच्यात अणुकराराबाबत चर्चा सुरू असतानाच राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कठोर इशारा दिला आहे. इराणला अण्वस्त्रे विकसित करू दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करत, अपेक्षित निकाल न मिळाल्यास अमेरिका वेगळा मार्ग अवलंबेल, असे त्यांनी म्हटले आहे. या वक्तव्यानंतर मध्यपूर्वेतील घडामोडींवर पुन्हा एकदा जगाचे लक्ष केंद्रित झाले आहे.

> "इराणला अण्वस्त्रे विकसित करू दिली जाणार नाहीत. वाटाघाटी योग्य दिशेने सुरू आहेत; मात्र अमेरिकेच्या हिताच्या अटी मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही हा विषय वेगळ्या पद्धतीने हाताळू."
> - **डोनाल्ड ट्रम्प, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष**

# पाकिस्तानी इन्फ्ल्युएन्सर शहजाद भट्टीवर भारतीय तपास यंत्रणांचे लक्ष

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने विविध राज्यांतून नऊ संशयितांना अटक केल्यानंतर पाकिस्तानी सोशल मीडिया इन्फ्ल्युएन्सर शहजाद भट्टी पुन्हा चर्चेत आला आहे.**



### सोशल मीडियातून सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर

धर्म, राष्ट्रवाद आणि भारत-पाकिस्तान संबंधांवरील व्हिडिओंमुळे प्रसिद्धी मिळवणारा पाकिस्तानी इन्फ्ल्युएन्सर शहजाद भट्टी आता भारतीय तपास यंत्रणांच्या रडारवर आला आहे. सीमापार गुन्हेगारी आणि दहशतवादी नेटवर्कशी कथित संबंध असल्याच्या आरोपांमुळे त्याची चौकशी सुरू असून, विविध राज्यांतील अटकसत्रांनंतर या प्रकरणाला अधिक गंभीर वळण मिळाले आहे.

स्वतःला व्यावसायिक, राष्ट्रवादी आवाज आणि धार्मिक मुद्यांचा समर्थक म्हणून सादर करणाऱ्या भट्टीवर भारतविरोधी कारवाया आणि सीमापार गुन्हेगारी नेटवर्कशी संबंध असल्याचे गंभीर आरोप तपास यंत्रणांकडून करण्यात येत आहेत.

पाकिस्तानातील पंजाब प्रांतातील रहिवासी असलेला भट्टी सोशल मीडियावरील ‘333’ या ब्रँडिंगमुळे प्रसिद्ध झाला. धर्म, राष्ट्रवाद आणि भारत-पाकिस्तान संबंधांवरील व्हिडिओंमुळे त्याने मोठा चाहतावर्ग निर्माण केला. मात्र, त्याचे नाव कालांतराने गुन्हेगारी आणि वादग्रस्त प्रकरणांशी जोडले गेले. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, भट्टीचे नाव पाकिस्तानातील काही गुन्हेगारी घटकांशी जोडले गेले असून त्याचे कथित संबंध भारतीय गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि त्याच्या नेटवर्कशीही असल्याचा दावा केला जात आहे. तसेच महाराष्ट्राचे माजी मंत्री बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपी झीशान अख्तरशी त्याचे संबंध असल्याची चर्चा आहे.

भारतीय यंत्रणांचा आरोप आहे की, भट्टीचा संबंध पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी असल्याची शक्यता असून तो सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील तरुणांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा आणि उत्तराखंडमध्ये त्याच्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, भट्टीने स्वतःवरचे सर्व आरोप फेटाळून लावत आपण कोणत्याही गुन्हेगारी किंवा दहशतवादी संघटनेशी संबंधित नसल्याचा दावा केला आहे. मात्र, अलीकडील अटकसत्रांनंतर भारतीय तपास यंत्रणांनी त्याच्याशी संबंधित नेटवर्कचा तपास अधिक तीव्र केला आहे.



# पेट्रोल-डिझेल निर्यातीवरील विंडफॉल करात कपात...

**महाईन्यूज । मुंबई**

केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यातीवरील विंडफॉल करात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, पेट्रोलवरील विंडफॉल कर प्रतिलिटर ३ रुपयांवरून १.५ रुपये करण्यात आला असून डिझेलवरील कर १६.५ रुपयांवरून १३.५ रुपये आणि विमान इंधनावरील कर १६ रुपयांवरून ९.५ रुपये प्रतिलिटर करण्यात आला आहे. हे नवे दर १ जूनपासून लागू होणार आहेत.

सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या निर्यातीवरील ‘रोड अँड इन्फ्रास्ट्रक्चर सेस’ शून्य केला आहे. मात्र, देशांतर्गत वापरासाठी असलेल्या पेट्रोल आणि डिझेलवरील विद्यमान शुल्क दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर देशांतर्गत इंधनाचा पुरवठा कायम ठेवण्यासाठी आणि निर्यातदारांना वाढलेल्या किमतींचा अतिरिक्त फायदा होऊ नये म्हणून सरकारने विंडफॉल कर लागू केला होता.

युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल ७३ डॉलरवरून १०० डॉलरच्या पुढे गेल्या आहेत. पश्चिम आशियातील तणाव आणि पुरवठा साखळीवरील परिणाम लक्षात घेऊन सरकारकडून वेळोवेळी या कराचा आढावा घेतला जात असून, ताज्या पुनरावलोकनात करदरात आणखी कपात करण्यात आली आहे. विंडफॉल कर म्हणजे एखाद्या कंपनीला विशेष किंवा अपवादात्मक परिस्थितीत अनपेक्षितपणे मोठा नफा झाल्यास त्या अतिरिक्त नफ्यावर सरकारकडून आकारला जाणारा कर होय.




## दृश्यम 3 चा बॉक्स ऑफिसवर जलवा!

दाक्षिणात्य सुपरस्टार मोहनलाल यांचा बहुप्रतिक्षित सस्पेन्स-थ्रिलर चित्रपट 'दृश्यम ३' सध्या बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत आहे. 'दृश्यम' मालिकेच्या पहिल्या दोन भागांना मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर तिसऱ्या भागाकडूनही प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा होत्या आणि हा चित्रपट त्या अपेक्षांवर खरा उतरल्याचे दिसून येत आहे. दिग्दर्शक जीतू जोसेफ यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेला 'दृश्यम ३' चित्रपटगृहात २१ मे रोजी प्रदर्शित झाला. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवसापासून चित्रपटाने कमाईचा वेग कायम ठेवला असून प्रेक्षकांसह समीक्षकांकडूनही त्याला भरभरून दाद मिळत आहे. चित्रपटाने पहिल्या दिवशी तब्बल 15.85 कोटी रुपयांची कमाई केली होती. आठवड्याच्या मध्यात कमाईत किंचित घट झाली असली, तरी वीकेंडला चित्रपटाने पुन्हा जोरदार मुसंडी मारली. आतापर्यंत 'दृश्यम ३'ने 91.30 कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. या चित्रपटासमोर अक्षय कुमारचा 'भूत बंगला', रितेश देशमुखचा 'राजा शिवाजी', सूर्या अभिनित 'करुप्पू' तसेच आयुष्मान खुराना आणि सारा अली खानचा 'पति, पत्नी और वो 2' यांसारख्या चित्रपटांचे आव्हान होते. याशिवाय लक्ष्य लालवानी आणि अनन्या पांडे यांचा 'चांद मेरा दिल' हाही त्याच काळात प्रदर्शित झाला. मात्र, या सर्व स्पर्धेला तोंड देत 'दृश्यम ३'ने आपला दबदबा कायम ठेवला आहे.

# उर्वशी रौतेलाचा संताप



बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेलाने सोशल मीडियावर अभिनेत्रींमध्ये होणारी तुलना आणि फॅन वॉरवर नाराजी व्यक्त केली आहे. एका चाहत्याने एआयच्या मदतीने एक फोटो तयार केला होता, ज्यात उर्वशीसह ऐश्वर्या राय, प्रियांका चोप्रा, दीपिका पदुकोण आणि आलिया भट्ट यांच्या स्टारडमची तुलना केली होती. फोटोमध्ये महिला स्टार्सना खाली वाकलेले दाखवले आहे इंटरनेटवर एआय फोटो व्हायरल होत होता. या फोटोमध्ये ऐश्वर्या रायला जागतिक स्टारडमच्या शिखरावर दाखवले होते. तर प्रियंका चोप्रा एका सिंहासनावर बसली होती आणि तिच्याजवळ दीपिका पदुकोण व माधुरी दीक्षित उभ्या होत्या. फोटोमध्ये आलिया भट्ट, कतरिना कैफ, करीना कपूर आणि उर्वशी रौतेला यांना त्यांच्या खाली गुडघे टेकून बसलेले दाखवले होते. या फोटोमध्ये सर्व अभिनेत्रींची नावे देखील टॅग केली होती. अभिनेत्रींना अशाप्रकारे कमी लेखल्याबद्दल उर्वशीने कठोर भूमिका घेतली आहे. हा फोटो तिने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. यावर प्रतिक्रिया देताना उर्वशीने याला 'टॉक्सिक' म्हटले. "प्रत्येक अभिनेत्रीचा स्वतःचा प्रवास असतो. कठोर परिश्रम आणि नशीब असते. महिलांची एकमेकांशी तुलना केल्याने किंवा फॅन वॉर घडवून आणल्याने फक्त नकारात्मकता पसरते," असे ती म्हणाली. याऐवजी आपण प्रतिभा, वाढ आणि दयाळूपणाचा आदर केला पाहिजे. कृपया अशा प्रकारची विषारी वृत्ती थांबवा, असे आवाहनदेखील उर्वशीने केले. चाहत्यांना अशा प्रकारच्या पोस्ट न बनवण्याचे आणि सर्व कलाकारांच्या कामाचे कौतुक करण्याची विनंती तिने केली आहे. उर्वशी सध्या कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी फ्रान्समध्ये आहे, जिथे ती सलग पाचव्यांदा भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. उर्वशी रौतेला कान्स फिल्म फेस्टिव्हल २०२६ मध्ये तिच्या लूकमुळे चर्चेत आहे. तिने यावेळी रेड कार्पेटवर योलांड ऑफिशियल लेबलचा ब्लॅक वेलवेट गाऊन परिधान केला होता, ज्यामध्ये व्ही-नेकलाइन होती.

# अन् लग्नाच्या विषयावरून शमिता भडकली



शमिता शेट्टीने सोशल मीडियावर तिचे वय आणि लग्नावरून टोमणे मारणाऱ्या ट्रोलर्सचा चांगलाच समाचार घेतला आहे. शमिताने तिच्या अधिकृत इन्स्टावर स्टोरी शेअर केली आहे. यामध्ये तिने वयावरून अश्लाघ्य शब्दांत ट्रोल करणाऱ्या युजर्सच्या प्रोफाईलचे थेट स्क्रीनशॉट शेअर करत त्यांना सडेतोड उत्तर दिले आहे. तसेच या अत्यंत असंवेदनशील ट्रोलर्सला सडेतोड उत्तर देण्याची हीच योग्य व नामी संधी असल्याचे म्हणत तिने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सोशल मीडियावरील एका नेटकऱ्याने, "आता तुमचे वय झाले आहे आणि तुम्ही पूर्वीसारख्या सुंदर दिसत नाहीत," अशी खोचक कमेंट शमिताच्या पोस्टवर केली होती. सोशल मीडियावर सतत सक्रिय असणाऱ्या आणि ट्रोलर्सला नेहमीच भीड न बाळगता उत्तर देणाऱ्या शमिताने लिहिले आहे की, "मी आता पूर्वीपेक्षा वेगळी दिसते हे मला पूर्णपणे मान्य आहे. वेळेनुसार आणि वयानुसार गोष्टी बदलत जातात आणि हा निसर्गाचा एक नियमच आहे. मानवी शरीरासह जगातील कोणतीच गोष्ट कायमस्वरूपी कधीच टिकून राहत नाही. माझ्या सध्याच्या वयाप्रमाणे मी अत्यंत सुदृढ, निरोगी आणि आनंदी आहे. देवाने मला आज जे काही दिले आहे, त्या प्रत्येक गोष्टीसाठी मी त्याची मनापासून आभारी आहे आणि हीच एक गोष्ट माझ्यासाठी वैयक्तिकरीत्या सर्वात महत्त्वाची आहे," असे शमिताने स्पष्टपणे लिहिले आहे. शमिताच्या वैयक्तिक आयुष्याबाबत आणि रिलेशनशिपबाबत चित्रपटसृष्टीत अनेकदा विविध चर्चा रंगल्या असल्या तरी तिने अद्याप लग्न केलेले नाही. तिची सख्खी बहीण शिल्पा शेट्टी ही शमितापेक्षा वयाने ३ वर्षांनी मोठी असून ती १४ वर्षांच्या मुलाची आई आहे. मात्र, शमिताने सध्यातरी लग्न न करता आपले सिंगल आयुष्य स्वतःच्या अटींवर जगण्याचा खंबीर निर्णय घेतला आहे. याच कारणावरून तिला सोशल मीडियावर ट्रोल करणाऱ्यांना शमिताने यावेळी चोख प्रत्युत्तर दिले. एका ट्रोलरने "वेळेत लग्न केले असते तर आज तुमची मुले खूप मोठी झाली असती," अशी कमेंट केली. यावर शमिताने अतिशय परखड उत्तर देत लिहिले की, "हो, कदाचित आज माझी मुले मोठी झाली असती, पण त्यात काय एवढे मोठे विशेष? तुम्ही सर्वांनी वेळेत लग्न करून या आयुष्यात असे काय तीर मारले आहेत किंवा काय मिळवले आहे?" असा प्रश्न शमिताने ट्रोलर्सला विचारला आहे. वयावरून आणि लग्नावरून सतत विनाकारण ट्रोल करणाऱ्या अशा विकृत मानसिकतेच्या नेटकऱ्यांना शमिताने थेट मला 'अनफॉलो' करा, असे देखील सुनावले आहे. ती पुढे म्हणाली की, "माझ्यासारख्या स्वतंत्र आणि सिंगल महिलांवर तुमचे बुरसटलेले पुरुषप्रधान विचार लादण्यासाठी आणि आमच्या वयावरून आमच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्यासाठी तुम्ही लोक आम्हाला सोशल मीडियावर फॉलो तरी कशाला करता? त्यामुळे माझ्यासाठी कृपया एक काम करा; मला तातडीने अनफॉलो करा," अशा कडक शब्दांत शमिताने ट्रोलर्सला थेट सुनावले.

# ३१३ धावा अन् १६ षटकारांसह शतक!

## नेपाळचा वर्ल्ड रेकॉर्ड; टी-२० क्रिकेट इतिहासात अशी कामगिरी करणारा जगातील एकमेव संघ

**महाईन्यूज । पॅरिस**

**नेपाळ क्रिकेट संघाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये न भूतो न भविष्यती असा विक्रम केला आहे. टी-२० इतिहासात जगातील कोणताच संघ जी कामगिरी करू शकला नाही, ती कामगिरी आता नेपाळ संघाने करून दाखवली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या पुरुष पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात नेपाळने चीनविरुद्ध विक्रमी धावसंख्या उभारत विक्रमांच्या पुस्तकात एक नवीन अध्याय लिहिला. नेपाळने २० षटकांत ३१३ धावा करून इतिहास घडवला.**




### ५ सर्वोच्च धावसंख्या

- ३४४/४ – झिम्बाब्वे विरुद्ध गांबिया
- ३१४/३ – नेपाळ विरुद्ध मंगोलिया
- ३१३/२ – नेपाळ विरुद्ध चीन
- ३०८/१ – जर्मनी विरुद्ध ऑस्ट्रिया
- ३०४/२ – इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका

नेपाळ आणि चीन यांच्यातील सामना सिंगापूरमध्ये खेळवला गेला. या सामन्यातीच नाणेफेक नेपाळने जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि चीनच्या गोलंदाजांची धुलाई केली. नेपाळ संघाने आपल्या निर्धारित २० षटकांत फक्त २ गडी गमावून ३१३ धावांचा डोंगर उभा केला. या विक्रमी कामगिरीचा हिरो सलामीवीर कुशल भुर्तेल होता, ज्याने स्फोटक शतक झळकावून सामना एकतर्फी केला.

कुशल भुर्तेलच्या या विक्रमी खेळीच्या बळावर चीनविरुद्ध सामन्यात नेपाळने ३१३ धावांचा डोंगर उभारला. यासह टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोन वेळा ३०० अधिक धावा करणारा चीन हा जगातील पहिला संघ ठरला आहे. कुशल भुर्तेलने आपल्या खेळीदरम्यान एकाच षटकात सहा षटकार खेचत क्रिकेट जगताला चकित केलं. त्याच्या या वादळी शतकामुळे नेपाळने चिनी गोलंदाजांची शाळा घेतली आणि धावसंख्या ३००च्या पुढे नेली. भुर्तेलने अवघ्या ३५ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं आणि नेपाळला ३१३ धावा उभारण्यास मदत केली.

नेपाळच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्यांदा संघाने ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. यापूर्वी सप्टेंबर २०२३ मध्ये, आशियाई क्रीडा स्पर्धेदरम्यान, नेपाळने मंगोलियाविरुद्ध ३१४/३ धावा करत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३०० धावांचा टप्पा ओलांडणारा जगातील पहिला संघ बनण्याचा विक्रम केला होता. आता नेपाळ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दोनदा ३००+ धावा करणारा जगातील पहिला संघ ठरला आहे. आतापर्यंत केवळ चार संघांनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत, परंतु दोनदा हा पराक्रम करणारा नेपाळ हा एकमेव संघ आहे.

३१४ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना चीन सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसत होता. त्यांची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली आणि केवळ शेंजियान झेंगच झुंज देऊ शकला. त्याने १५ चेंडूंमध्ये ३१ धावा केल्या, तर इतर चारही फलंदाज एकही धाव करू शकले नाहीत. नेपाळच्या गोलंदाजांनीही उत्कृष्ट कामगिरी करत संपूर्ण चिनी संघाला १९.२ षटकांत केवळ ९२ धावांवर सर्वबाद केलं. अशाप्रकारे, नेपाळने हा सामना २२१ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला.

# निवड चाचणीत विनेश पराभूत; आशियाई स्पर्धेत खेळण्याचे स्वप्न अधुरेच

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**विनेश फोगटचे आंतरराष्ट्रीय कुस्तीतील पुनरागमन लांबणीवर पडले आहे. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाकडून परवानगी मिळाल्यानंतर विनेश शनिवारी आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचणीत सहभागी झाली. मात्र, ५३ किलो वजनी गटात सुरुवातीच्या झुंजीनंतर उपांत्य फेरीत तिला मीनाक्षी गोयतकडून ४-६ असा पराभव पत्करावा लागला.**



### वादग्रस्त उपांत्यपूर्व लढत

विनेशने पहिल्या सामन्यात ज्योतीवर ७-१ असा सहज विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. त्यानंतर, उपांत्यपूर्व फेरीत अत्यंत आक्रमक आणि तंत्रकुशल निशू कुमारीविरुद्ध शेवटी ६-६ अशा बरोबरीला विनेशला निर्णायक गुण मिळाला आणि तिने हा सामना ७-६ असा जिंकला.

### विनेशची दमछाक

या भावनिक आणि थकवणाऱ्या सामन्याचा विनेशवर परिणाम झाला. गेल्या काही महिन्यांत ती स्पर्धात्मक कुस्तीपासून दूर असल्याचाही फटका तिला बसला. उपांत्य फेरीत मीनाक्षीविरुद्ध खेळताना तिला तोच वेग आणि आक्रमकता राखता आली नाही. अखेर ती ४-६ अशी पराभूत झाली. मीनाक्षीने अत्यंत संयमाने कुस्ती करताना दमलेल्या विनेशची अधिक दमछाक केली आणि बचाव भक्कम ठेवत विजय मिळवला.

पॅरिस ऑलिम्पिकमधील कटू अनुभवानंतर राष्ट्रीय संघात पुन्हा स्थान मिळवण्याच्या विनेशच्या प्रयत्नांना यश मिळाले नाही. "मी अपयशी ठरले असे मला वाटत नाही. मी संपूर्ण व्यवस्थेविरुद्ध लढत होते. प्रत्येक पायरीवर मला संघर्ष करावा लागला. मला योग्य वागणूक मिळाली नाही. अर्थात, माझ्याशी लढलेल्या खेळाडूंबद्दल माझ्या मनात कोणताही आकस नाही. निवड चाचणीत हार पत्करावी लागली असली, तरी मी पुन्हा जोरदार पुनरागमन करेन," असे विनेशने क्रीडा संकुल सोडण्यापूर्वी सांगितले.

पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीतील दुर्दैवी अपात्रतेनंतर विनेश पहिल्यांदाच मॅटवर परतली होती. मात्र, दिवसाची सुरुवातच तिच्यासाठी नाट्यमय झाली होती. अधिकृत वजन मोजणीदरम्यान विनेशला सुरुवातीला ५० किलो वजनी गटातच खेळण्याची परवानगी देण्यात आली. याच गटात तिने पॅरिस ऑलिम्पिकसह तिच्या शेवटच्या चार आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या होत्या. यावर विनेशने तीव्र आक्षेप घेतला आणि भारतीय कुस्ती महासंघावर भेदभावाचा आरोप केला. यानंतर महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह यांनी मध्यस्थी करत तिला ५३ किलो वजनी गटाच्या चाचणीत भाग घेण्याची परवानगी दिली. वजन मोजणीत ५३.९ किलो वजन भरल्यानंतर विनेशचा गटात समावेश करण्यात आला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।
दि. 1 जून 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## जनगणना प्रक्रियेस नागरिकांचे सहकार्य आवश्यक; आयुक्त



महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**‘जनगणना २०२७’ अंतर्गत सुरू असलेली ‘घरसूचीकरण व घरगणना’ प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.**

महापालिका क्षेत्रात १६ मेपासून प्रगणकांमार्फत घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया सुरू असून, स्व-गणना माध्यमातून नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी आणि अंतिम नोंदणी सध्या केली जात आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला स्व-गणना ओळख क्रमांक (SE ID) प्रगणकांना उपलब्ध करून द्यावा, असे डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

स्व-गणना ओळखक्रमांक उपलब्ध झाल्यानंतरच संबंधित घराची जनगणना प्रक्रिया अंतिम स्वरूपात पूर्ण होऊ शकते. ज्या नागरिकांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही, त्यांची माहिती प्रगणकांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे नोंदविण्यात येत असून ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी जनगणना ही राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची प्रक्रिया असून, विकास नियोजनासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहिती संकलनाचा हा आधार मानला जातो. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि नागरी सेवांच्या प्रभावी नियोजनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

जनगणना ही शहराच्या विकास नियोजनाचा महत्त्वाचा आधार असून नागरिकांनी अधिकृत प्रगणकांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा तसेच, प्रगणकांकडून विचारण्यात येणारी माहिती वेळेत व अचूकपणे उपलब्ध करून देत नागरिकांनी ‘जनगणना २०२७’ प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी केले.

भारत की जनगणना
2027
CENSUS OF INDIA
जनगणना से जन कल्याण

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# ताथवडे-पुनावळे अंडरपास रुंदीकरणाला "ग्रीन सिग्नल"

## ताथवडे, पुनावळे, वाकड सेवा रस्त्यांचे काम प्राधान्याने मार्गी लागणार : आमदार शंकर जगताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**ताथवडे, पुनावळे आणि वाकड या परिसरातील तीन महत्त्वाच्या सेवा रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे सक्त आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी दिले. याचबरोबर, ताथवडे आणि पुनावळे येथील अंडरपासमधील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन हे अंडरपास रुंद करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. या भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक असून अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश गडकरी यांनी दिल्याची माहिती चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी दिली.**



राष्ट्रीय महामार्गावरील प्रलंबित कामांविषयी शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यामध्ये बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उपस्थित रहात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील (पुणे पश्चिम बायपास) वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांकडे आमदारांनी लक्ष वेधले.

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे अंडरपास, पुनावळे अंडरपास, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अंडरपास या परिसरांमध्ये सध्याच्या भुयारी मार्गांची क्षमता अतिशय कमी आहे. परिणामी, सेवा रस्त्यांचे काम तातडीने पूर्णत्वाला नेणे गरजेचे आहे. हीच मागणी गडकरी साहेबांकडे मांडली आहे. सेवा रस्त्यांची गरज आणि नागरिकांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने या रस्त्यांचे काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश गडकरी यांनी दिले आहेत.

पुनावळे, वाकड, किवळे आणि रावेत या प्रमुख जंक्शन्सवरून रोज लाखो वाहनांची आणि जड मालवाहतुकीची ये-जा सुरू असते. वाहतुकीचा ताण लक्षात घेता या ठिकाणी अतिरिक्त बॉक्स स्ट्रक्चर्स आणि नवीन अंडरपास बांधण्याबाबत देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून हिरवा कंदील मिळाला आहे.



> ताथवडे, पुनावळे आणि वाकड परिसरातील अंतर्गत वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी सेवा रस्ते आणि अंडरपासचे रुंदीकरण अत्यंत आवश्यक आहे. या अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे या भागातील नागरिकांना आणि आयटी क्षेत्रातील नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

# एक्सप्रेसवे लगत हातभट्टी दारूचा कारखाना उद्ध्वस्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत शिरगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध हातभट्टी दारू निर्मितीच्या अड्ड्यावर शिरगाव पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे १ लाख ४० हजार रुपये किमतीचे हातभट्टी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे कच्चे रसायन नष्ट करण्यात आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच महिला आरोपी घटनास्थळावरून पसार झाली.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ मे रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास शिरगाव गाव हद्दीतील मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लगत असलेल्या एका खड्ड्याजवळ अवैध हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शिरगाव पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला.

छाप्यामध्ये राधिका कुमार नानावत (रा. शिरगाव, ता. मावळ, जि. पुणे) ही महिला हातभट्टी दारू निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कच्चे रसायन भिजत घालून ठेवत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचताच संबंधित महिला आरोपीने तेथून पळ काढला.

कारवाईदरम्यान पोलिसांनी अंदाजे १ लाख ४० हजार रुपये किमतीचे कच्चे रसायन जप्त करून नष्ट केले. या प्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार महिला आरोपीचा शोध सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैध दारू व्यवसायाविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

# महापालिकेची २५० कोटींच्या मालमत्ता कराची वसुली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या प्रारंभी मालमत्ता कर वसुलीत लक्षणीय प्रगती नोंदविली आहे. १ एप्रिल ते २९ मे २०२६ या कालावधीत महापालिकेकडे २५० कोटी ७२ लाख रुपयांहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे.**

महापालिकेच्या माहितीनुसार, आतापर्यंत शहरातील २ लाख ४७ हजार ३७१ मिळकतधारकांनी मालमत्ता कर भरला आहे. यामध्ये डिजिटल माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे दिसून आले असून, २ लाख २१ हजार ७६३ नागरिकांनी ऑनलाइन कर भरणा करून १० टक्के सवलतीचा लाभ घेतला आहे. या माध्यमातून २३० कोटी ५७ लाख रुपयांहून अधिक महसूल जमा झाला आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. चालू आर्थिक वर्षाची कर देयके संबंधित मालमत्ताधारकांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका उप आयुक्त सचिन पवार यांनी यावेळी सांगितले.

> मालमत्ता कराच्या वेळेवर होणाऱ्या भरण्यामुळे शहरातील विकासकामांना आर्थिक बळ मिळते. ऑनलाइन कर भरण्यास नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद समाधानकारक असून, अद्याप कर न भरलेल्या नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

महापालिकेकडून महिलांच्या नावावरील मालमत्ता, दिव्यांग नागरिक तसेच पर्यावरणपूरक निवासी गृहनिर्माण संस्थांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच ३० जून २०२६ पूर्वी ऑनलाइन कर भरणाऱ्या नागरिकांना १० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जात असल्याने ऑनलाईन कर भरण्यास नागरिक पसंती देत असल्याचे दिसून येत आहे.

# सोलापुरातून पुण्यात आला, योगेशचा झाला 'सिकंदर'

## २२ जणांचा जीव घेणाऱ्या तरुणाबद्दल धक्कादायक माहिती

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**विषारी दारूकांड प्रकरणातील मुख्य आरोपी योगेश व्हानकडे याने खरी ओळख लपविण्यासाठी चक्क 'सिकंदर राठोड' हे काल्पनिक नाव धारण केल्याचे तपासात उघड झाले आहे. मागील तीन वर्षांपासून बेकायदा दारूविक्रीचा काळा धंदा करताना पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तो खोट्या नावाने वावरत होता.**





'मिथेनॉल'मिश्रित गावठी दारूच्या सेवनाने पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये वीसहून अधिक जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी योगेश रामचंद्र व्हानकडे (वय २३, रा. केशवनगर, मुंढवा), कर्नेलसिंग तखतसिंग विरका (वय ७३), गुरमंतसिंग कर्नेलसिंग विरका (वय ४५, दोघे रा. संजयनगर, फुगेवाडी), राधेश्याम हरिराम प्रजापती (वय ३५, रा. उरुळी कांचन) यांना पुणे न्यायालयाने १० जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात दापोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार योगेश राजेंद्र व्हानकडे (वय २३) हा मूळचा सोलापूर जिल्ह्यातील बेलाटी लमाण तांडा येथील रहिवासी आहे. रोजगाराच्या निमित्ताने तो काही वर्षांपूर्वी पुण्यात आला. सुरुवातीला कुंजीरवाडी आणि घोरपडी भागांत राहिल्यानंतर, गेल्या पाच महिन्यांपासून तो केशवनगर परिसरातील गुरुकृपा सोसायटीत आई-वडिलांसह राहत होता. स्वतःला सर्वसामान्य नागरिक भासविणारा योगेश प्रत्यक्षात तीन वर्षांपासून दारूविक्री व्यवसायात सक्रिय असल्याचे तपासात उघड झाले आहे.

उरुळी कांचन परिसरातील राजू प्रजापती उर्फ राधेश्याम गोयल हा या साखळीतील त्याचा मुख्य पुरवठादार होता. योगेश हा प्रजापतीकडून ३५ लिटर क्षमतेचा एक हातभट्टीचा कॅन १७०० ते १८०० रुपयांना विकत घ्यायचा. त्यानंतर ही दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांतील बेकायदा मद्य विक्रेत्यांना पुरवित होता. योगेश याच्याविरोधात मुंढवा आणि हडपसर पोलिस ठाणे आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बेकायदा दारूची वाहतूक, साठा आणि विक्री प्रकरणात त्याच्यावर यापूर्वी कारवाया झाल्या.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात अल्पावधीत झालेल्या मृत्यूंचे नेमके कारण शोधण्यासाठी मृतांच्या अंतर्गत अवयवांचे (व्हिसेरा) नमुने प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. सार्वजनिक हिताचा विषय लक्षात घेऊन या नमुन्यांची तातडीने तपासणी केली जाणार असून, पुढील दोन ते तीन दिवसांत अहवाल प्राप्त होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

आतापर्यंत मृत्यू झालेल्या रुग्णांच्या लक्षणांवरून 'मिथेनॉल'ची विषबाधा हे मुख्य कारण असल्याचा प्राथमिक अंदाज डॉक्टरांसह न्यायवैद्यक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. 'मिथेनॉल'मुळे मृत्यू होण्याची शक्यता अधिक आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण आणि कोणत्या रसायनांमुळे मृत्यू झाला, हे 'व्हिसेरा' तपासणीतूनच स्पष्ट होणार असल्याचे प्रयोगशाळेतील अधिकाऱ्यांनी सांगितले. मृतांच्या शवविच्छेदनादरम्यान पोट, आतडे, यकृत, किडनी, प्लीहा यांचे नमुने; तसेच रक्त जतन करून ते तपासणीसाठी पाठविण्यात येतात. अंतर्गत अवयवांबरोबरच २० सीसी रक्त व्हिसेरा घेण्यात येतो. २० सीसी व्हिसेरामध्ये शवविच्छेदनावेळी मृताच्या शरीरातून घेतलेले २० मिलिलिटर रक्ताचे नमुने घेतले जातात. यामुळे विषबाधा, मद्य, औषधे, रसायने किंवा इतर विषारी पदार्थांमुळे मृत्यू झाला का, याची तपासणी करण्यात येते.

### तपासणीचा वेग वाढविणार

साधारणतः एक व्हिसेरा तपासण्यासाठी आणि अहवाल तयार करण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा कालावधी लागतो. मात्र, या प्रकरणात कमी वेळेत तपासणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. काही नमुने प्रयोगशाळेत दाखल झाले असून, उर्वरित नमुनेही लवकरच पोहोचणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेतील 88 अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**महापालिकेच्या विविध विभागांचे एकूण 88 अधिकारी व कर्मचारी रविवारी (दि. 31) सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.**




संत तुकारामनगर, पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे झालेल्या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, किरण गायकवाड, प्रफुल्ल पुराणिक, पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजर्डे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता माणिक चव्हाण, कार्यकारी अभियंता रवींद्र सूर्यवंशी, सहाय्यक आयुक्त राजीव घुले, राजाराम सरगर, मुख्याध्यापक बुधा नाडेकर, रामदास चपटे, बाळासाहेब आल्हाट, मुख्याध्यापिका पुष्पलता महाकाळ, अंजली झगडे, श्रीकांत चौगुले, सविता म्हस्के, सुनंदा शिंदे, भारती वर्णे, संगीता वाघमारे, प्रशासन अधिकारी ग्यानचंद भाट, सुचेता कुलकर्णी, कार्यालय अधीक्षक महादेव बोरे, क्रीडा पर्यवेक्षक गोरक्ष तिकोने, रंगराव कारंडे यांचा समावेश आहे.

तसेच, क्रीडा शिक्षक मंगल जाधव, स्टाफ नर्स उज्वला जाधव, विद्युत पर्यवेक्षक अनिल नायर, फार्मासिस्ट शशिकांत रिटे, मुख्य लिपिक राजू वेताळ, उपशिक्षक संध्या गायकवाड, मिनाक्षी लोखंडे, केमिस्ट उमा भोगे, भांडारपाल प्रशांत आल्हाट, केशव घाटगे, भगवान शिंगाडे, धनाजी माळवदकर, अंकुश माळी, धनाजी गावडे, हेमंत ढवळे, अनिल मोरे, आबा पाटील, हमीदसाहेब पटेल, गोरक्ष आगळे, शांताराम घारे, हनुमंत घाडगे, दत्तात्रय तापकीर, मोहनदास सर्वगोड, विठ्ठल निगडे, दिलीप गायकवाड, लक्ष्मण तिटकारे, शशिकांत शिंदे यांचा समावेश आहे. तसेच, संजीवनी पवार, नंदकुमार वाघेरे, बाळासाहेब इंगळे, नितीन काळभोर, एकनाथ वांभिरे, सावकार भिवरे, चंद्रकांत मिरजकर, राजाराम लोंढे, बाबूराव चिंचवडे, बाळू साठे, रविंद्र कुदळे, नारायण केसवड, रमेश दोरगे, रमेश देवकाते, राजू आल्हाट, छाया थोरात, शशीकला पाटील, माणिक कांबळे, मुकुंद कोंढरे, मालन ओव्हाळ, सुधीर जगताप, धनंजय ओव्हाळ, देवराम पवार, विश्वनाथ बोऱ्हाडे, दिलीप हनमंते व विजय जगताप हे निवृत्त झाले.

### यांनी घेतली स्वेच्छानिवृत्ती

स्टाफ नर्स मीरा शिंदे, मुकादम विजय माछरे, सफाई कर्मचारी प्रमिला जाधव, आशा लादे, रोशन मुजावर, सुमन ओव्हाळ, राजू लोंढे, बाजीराव कुटे, मालती वाघेरे, वैजयंती देवकर, लतिका बुट्टे, मनोहर शितोळे महादेव तेलंगी व विजयमाला कांबळे यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर प्रास्ताविक तानाजी नरळे यांनी केले.

# चऱ्होलीत पत्नीला अमानुष मारहाण!

## आर्थिक फसवणुकीचा जाब विचारताच पतीचा संतापजनक हल्ला

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चऱ्होली परिसरात कौटुंबिक हिंसाचाराचा एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, पत्नीने आर्थिक फसवणुकीचा जाब विचारताच पतीने तिच्यावर अमानुष मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून पती किरण सुरेश पानसरे याच्याविरोधात दिघी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, किरण पानसरे हा चऱ्होली येथील आस्था डेव्हलपर्सच्या इमारतीतील फ्लॅट क्रमांक ३०८ मध्ये वास्तव्यास आहे. त्याने पत्नीचा विश्वास संपादन करून विविध कारणे सांगत तिच्याकडून लाखो रुपये उकळल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मात्र, या आर्थिक व्यवहारात फसवणूक झाल्याची कुणकुण लागताच पत्नीने याबाबत जाब विचारण्याचा प्रयत्न केला.

याच कारणावरून दोघांमध्ये तीव्र वाद झाला. वादाचे रूपांतर हिंसक झटापटीत झाले असून, संतापाच्या भरात आरोपी पतीने पत्नीला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत महिला गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ अवस्थेत कोसळली. तातडीने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

घटनेनंतर पीडित महिलेने रुग्णालयातूनच दिघी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपीविरोधात आर्थिक फसवणूक, कौटुंबिक हिंसाचार आणि गंभीर दुखापत केल्याप्रकरणी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### परिसरात संताप कडक कारवाईची मागणी

या घटनेमुळे चऱ्होली व दिघी परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पत्नीवर झालेला हा अमानुष अत्याचार निषेधार्ह असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी आणि पीडित महिलेला तातडीने न्याय मिळावा, अशी मागणी स्थानिक नागरिक व महिला संघटनांकडून होत आहे. दिघी पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.


HOLISTIC LEARNING

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS

PRIYADARSHANI SCHOOL, ALANDI



42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOL

9823231705
8459167326